# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे.

जुनी मध्यवर्ती इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे. ४११००१
**फोन नं.(०२०) २६०५०६४१, २६०५१११०, २९७०६४११ ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com

## ई-निविदा जाहिरात क्रमांक : २/२०२१ १५५१ दि. ०७/५/२०२१

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य पुणे,या कार्यालयात कामकाजासाठी लिपीक टंकलेखक व शिपाई पदांचे सेवा उपलब्ध करुन देणेकरिता, बाह्यस्त्रोताव्दारे (एजन्सी/संस्था/कंपनी/सहकारीसंस्था इ.व्दारे)मनुष्यबळ पुरविणा-या यंत्रणेची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येतआहेत.

**कामाचा प्रकार** :- ६ लिपीक-टंकलेखक व ३ शिपाई अशा एकूण ९ पदांची कंत्राटी तत्वावर सेवा उपलब्ध करुन देणेचे काम

**निविदा वेळापत्रक** :-

| | |
|---|---|
| १) ई-निविदा दाखल करण्याचा कालावधी | :- दिनांक १०/५/२०२१ सकाळी ११.०० पासून ते दिनांक २५/०५/२०२१ |
| २) ई-निविदा दाखल करण्याचा अंतिम | :- दिनांक २५/०५/२०२१ सायं ५ वाजेपर्यंत |
| ३) ई-निविदा उघडणे | :- दिनांक २७/०५/२०२१ दुपारी १२.३० वाजता |

इच्छुक एजन्सी/संस्था/सहकारीसंस्था इ. यांचेसाठी माहिती व सविस्तर टेंडर, अर्जाचा नमुना आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्ती इ. https://mahatenders.gov.in आणि मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांची वेबसाईटwww.sahakarayuakta.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

०७/०५/२०२१

(यशवंत गिरी)
अध्यक्ष ई-निविदा समिती तथा सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

दिनांक - १०/०५/२०२१

ई-निविदा (Tender Document)

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालयात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी ६ लिपीक टंकलेखक व ३ शिपाई अशा एकूण ९ पदांची कामे बाहय यंत्रणेद्वारे करुन घेणेकरिता /सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता सदर अर्जाची https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-टेंडरने विक्री व स्विकृती होणार आहे.

| अ. क्र. | बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावरील पदांची सेवा उपलब्ध करुन घेणेचा तपशील | अंदाजित किंमत रक्कम | बयाणा रक्कम (EMD) | performance Security Deposit | निविदेची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | लिपिक- टंकलेखक – ६ पदे | 12,95,350 | 12,955 | ई-निविदेव्दारे अंतिम होणाऱ्या दरकराराच्या एकूण रक्कमेच्या 3% शासन नियमाप्रमाणे | रु.2,240/- ( निविदा अर्ज फी 2000+ 240 GST नियमाप्रमाणे) |
| २ | शिपाई – ३ पदे | 6,04,450 | 6,045 | | |
| एकूण ९ पदे | | रु. 19,00,000 | रु.19,000/- | | |

१. उपरोक्त अंदाजित किंमत ही संभाव्य असून कमी जास्त होण्याची शक्यता आहे.
२. सदरची मागणी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयात ६ लिपिक नि टंकलेखक व ३ शिपाई या पदांच्या सेवा पुरविणे या कामासाठी बाहययंत्रणेद्वारे करुन घेणेबाबत दिलेली आहे. निविदाधारकास शासकीय सेवा कामकाज/पुरवठयाचा कामकाजाचा पुर्वानुभव असणे आवश्यक राहील. त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याकडील अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
३. सदरची ई-निविदेतील मागणी करण्यात आलेले दर हे प्रत्यक्षात काम करणारे कर्मचारी यांचे परिश्रमिक व इतर बाबी ह्या शासनाने ठरवून दिलेल्या प्रचलित नियम/शासननिर्णय/परिपत्रके/ आदेशाप्रमांणे राहील. तसेच सदरचे मागणी करण्यात आलेले दर हे शासनाचे प्रचलित आदेश/परिपत्रक/तरतूदीप्रमाणे Floating लवचिक असून शासनाने वेळोवेळी घोषित केलेले व बदलणारे दर लागू राहतील. याचीही नोंद पुरवठादार यांनी घ्यावी.
४. दरकरार अंतिम होणाऱ्या पुरवठादार यांना दरमहा अदा करण्यात येणारे परिश्रमिकाची एकूण रक्कमही शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या अनुदान/तरतूदीवर आधारित राहील. एखाद्या वेळेस शासनाकडून परिश्रमिक अदा करण्यासाठी अनुदान विलंब झाल्यास पुरवठादार यांनी संबंधित कंत्राटी सेवा देणारे कर्मचारी यांना दरमहा नियमित परिश्रमिक अदा करणे बंधनकारक राहील (कोणत्याही परिस्थितीत कर्मचाऱ्यांचे परिश्रमिक अडवून ठेवता येणार नाही.) ही अट मान्य असेल तरच पुरवठादारांनी या ई-निविदा प्रक्रियेत भाग घ्यावा.
५. तसेच पुरवठादार यांनी संबंधित कंत्राटी कर्मचारी यांचे PF, ESIC व इतर रक्कमा संबंधित प्राधिकरणाकडे दरमहा वेळेत जमा करणे आवश्यक राहील व त्याची पोहोच दरमहा राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
६. कोणतेही कारण न देता ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.
७. ई-निविदा फॉर्म फी व बयाणा रककमही ऑनलाईन पेंमेट गेट-वे पध्दतीने भरावयाची आहे.व रक्कम भरल्याची पावती ई निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.
८. सदर ई-निविदा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे उघडण्यात येतील.
९. E-Tender व Tender Notice मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

## **Brief Summary of Inquiry**

**Offer should be submitted in 2 envelope system :**

a) Technical Bid – Envelope No. – 1
b) Price Bid – Envelope No. – 2

Financial/ Price Bid form is enclosed as Annexure -7